# महाराष्ट्र विधानपरिषद
# दिवसाच्या कामकाजाचा क्रम
# शुक्रवार, दिनांक २ ऑगस्ट, २०१३
# (सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० वाजेपर्यंत)

**म.वि.प.नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव - चर्चा पुढे सुरू - मंत्र्यांचे उत्तर -**

**सर्वश्री विनोद तावडे,** रामदास कदम, पांडुरंग फुंडकर, जयंत पाटील, सुमंतराव गायकवाड, चंद्रकांत पाटील, डॉ.दिपक सावंत, श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ.नीलम गोऱ्हे, डॉ.रणजित पाटील, श्री रामनाथ मोते, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री विजय ऊर्फ भाई गिरकर, नागो गाणार, भगवान साळुंखे **वि.प.स. याचा म.वि.प.नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव -**

"एमएमआरडीए क्षेत्रातील मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, भिवंडी, वसई-विरार, मिरा-भाईंदर इत्यादी महानगरपालिकांमध्ये निधी अभावी रस्ते विकास, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व दळणवळणाच्या समस्या निर्माण होणे, या क्षेत्रात पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी नेमलेल्या मुंबई महानगर विकास प्राधिकरणाने मेट्रो रेल्वे प्रकल्प, मोनो रेल्वे प्रकल्प, कांदळवन उद्यान इत्यादी प्रकल्पांची घोषणा करणे, परंतु सर्व प्रकल्पांचे काम रखडलेले असणे, सर्व प्रकल्पाचे काम रखडल्यामुळे मुंबईत दळणवळणाच्या समस्या निर्माण होणे, ही कामे वेळेत पूर्ण न झाल्यामुळे कंत्राटदारावर कारवाई करण्याची आवश्यकता असताना एमएमआरडीए च्या अधिकाऱ्यांकडून संबंधित कंत्राटदारावर कोणतीही कारवाई करण्यात न येणे, घनकचरा व्यवस्थापनाचे काम एमएमआरडीए मार्फत रामकी या काळ्या यादीत असलेल्या भ्रष्ट कंपनीस देण्याचा घाट शासनामार्फत घालण्यात येणे, एमएमआरडीए मध्ये भ्रष्टाचार होत असताना म्हाडा व सिडकोमध्ये भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे उघडकीस येऊनही त्यांच्यावर कारवाई न होणे, धोकादायक इमारतीचा प्रश्न ऐरणीवर आलेला असताना व या वर्षी होणाऱ्या अतिवृष्टीमुळे या प्रश्नाने गंभीर स्वरुप धारण केलेले असताना शासनाकडून नागरिकांच्या सुरक्षितेबाबत कोणताही धोरणात्मक निर्णय घेण्यात न घेणे, डिम कन्व्हेनिअन्सबाबत मा.मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक घोषणा केलेली असताना घोषणेची अमलबजावणी मात्र करण्यात न येणे, मुंबई विमानतळामुळे विस्थापित झालेल्या लोकांचे पुनर्वसन करण्यासाठी नेमलेल्या एमआयएएल कंपनीने हजारो प्रकल्पग्रस्तांचे अद्यापपर्यंत पुनर्वसन न करणे, त्याचवेळेस नवी मुंबई विमानतळाची घोषणा सन २००५ पासून करुनही

अद्यापपर्यंत विमानतळासाठी आवश्यक असणारी जमिन देखील संपादित करण्यास शासनास अपयश येणे, एमएमआरडीए क्षेत्रातील समस्या सोडविण्यासाठी महानगरपालिका व शासनाच्या विविध यंत्रणा यांचा समन्वय घडवून केंद्र शासनाकडून जास्तीतजास्त निधी उपलब्ध होईल याकरिता एक समन्वय समिती असण्याची आवश्यकता परंतु या सर्व समस्यांबाबत शासनाचे झालेले दुर्लक्ष त्यामुळे जनतेमध्ये निर्माण झालेला असंतोष, शासनाने या प्रकरणी तातडीने करावयाची कारवाई व याबाबतची शासनाची भूमिका विचारात घेण्यात यावी.

## (दुपारी १२.१५ वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे -**

**(अ) तारांकित प्रश्न.**

**(ब) शुक्रवार दिनांक २६ जुलै, २०१३ रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**(क) अतारांकित प्रश्नोत्तरांची अकरावी, बारावी, तेरावी, चौदावी, पंधरावी, सोळावी, सतरावी, अठरावी, एकोणिसावी यादी मुद्रीत स्वरुपात व विसावी, एकविसावी यादी अमुद्रीत स्वरुपात सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**(ड) तारांकित प्रश्नांची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

(१) **मुख्यमंत्री** : "नागपूर शहरातील राजभवन या शासकीय इमारतीवर अंजूमन हामी इस्लाम या संस्थेने अतिक्रमण करुन इमारतीची नासधुस केल्याबाबत " या विषयावरील श्री.मितेश भांगडीया, श्री. विनोद तावडे, डॉ. रणजित पाटील, श्री.प्रविण पोटे पाटील वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ४२००५ ला दिनांक १७ जुलै, २०१३ रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

(२) **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** : "यवतमाळ जिल्ह्यातील करंजी, वणी व घुग्घुस येथे बी.ओ.टी. तत्वावर सुरु असलेले रस्त्याचे बांधकाम निकृष्ट प्रतीचे असल्याबाबत" या विषयावरील श्री.संदिप बाजोरिया, श्री.सतीश चव्हाण, श्री.किरण

पावसकर, श्री.रमेश शेंडगे, श्री.हेमंत टकले, वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३४९८२ ला दिनांक ११ डिसेंबर, २०१२ रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

(३) **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** : "राज्यात एड्स नियंत्रणाच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांची उधळण झाल्याबाबत" या विषयावरील श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, वि.प.स. आणि श्री.गोविंदराव आदिक, श्री.सुधाकर गणगणे, श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील, श्री.राजन तेली, माजी वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३७३०० ला दिनांक ४ एप्रिल, २००८ रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

**दोन : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे -**

(१) **मुख्यमंत्री** :

**(अ)** "महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा दहावा वार्षिक अहवाल", सभागृहासमोर ठेवतील.

**(ब)** "महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा हिशेब व हिशेब तपासणी अहवाल", सभागृहासमोर ठेवतील.

**(क)** "शहर व औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित यांचा सन २००८-२००९ या वर्षाचा एकोणचाळीसावा वार्षिक अहवाल", सभागृहासमोर ठेवतील.

(२) **उप मुख्यमंत्री** : भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा "भाडेपट्टीवर दिलेल्या शासकीय जमिनींचे संपादणूक लेखापरिक्षण अहवाल क्रमांक - ५" सभागृहासमोर ठेवतील.

(३) **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून)** : **(अ)** "मा.राज्यपाल महोदयांनी विविध पाटबंधारे

मंत्री

विकास क्षेत्रासंदर्भात दिलेल्या निदेशांच्या अनुषंगाने आर्थिक वर्ष २०१२-१३ मधील वितरीत तरतुद व मार्च, २०१३ अखेर खर्चाचा महामंडळ/जिल्हानिहाय तपशिल", सभागृहासमोर ठेवतील.

**(ब)** "महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा वार्षिक अहवाल", सभागृहासमोर ठेवतील.

**(क)** "महाराष्ट्र भूविकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०११-१२ या वर्षाचा वार्षिक अहवाल व दिनांक ३१ मार्च, २०१२ अखेरचा ताळेबंद - नफा तोटा पत्रक", सभागृहासमोर ठेवतील.

**(ड)** "कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचा सन २०१०-२०११ या वर्षाचा लेख्यावरील भारताचे नियंत्रण व महालेखापाल यांचा लेखा परिक्षण अहवाल", सभागृहासमोर ठेवतील.

(४) **पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय मंत्री** : "महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांचे सन २००९-२०१०, २०१०-२०११ व २०११-२०१२ या वर्षांचे वार्षिक अहवाल", सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : विधानपरिषदेने संमत केलेल्या विधेयकांना विधानसभेची संमती मिळाल्याचे जाहीर करण्यात येईल.**

**चार (अ) म.वि.प. नियम ९३ अन्वये निवेदन - असल्यास.**

**(ब) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनेची आश्वासित माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**ग्रामविकास मंत्री** : "पंचायत समिती, सावंतवाडी येथील गट शिक्षणाधिकारी यांनी आयुक्तांची परवानगी न घेता शिक्षकांचे प्रतिनियुक्तीचे आदेश काढणे", या विषयावरील श्री. किशनचंद तनवाणी, वि.प.स. व इतर यांनी दिनांक ३१ मार्च, २०११ रोजी उपस्थित केलेल्या म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनेवरील निवेदनावेळी दिनांक ७ एप्रिल, २०११ रोजी दिलेल्या आश्वासनानुसार आश्वासित

माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

पाच : (अ) **लक्षवेधी सूचना - (म.वि.प.नियम १०१ अन्वये) -**

(१) **(बुधवार, दिनांक ३१ जुलै, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना) -**

**सर्वश्री. वसंतराव खोटरे,** विक्रम काळे, डॉ. सुधीर तांबे **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"विदर्भ ज्युनिअर टिचर्स असोसिएशन (विज्युक्टा) च्या वतीने गेल्या वर्ष भरात विविध मागण्यांसाठी चार टप्प्यात केलेली आंदोलने, दिनांक १ जानेवारी १९९६ पासून पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे सुधारीत वेतन श्रेणी लागू करणे, दिनांक १ नोव्हेंबर २००५ पूर्वी अंशतः अनुदानित तत्वावर लागलेल्या शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागु करणे, ४२ दिवसाची संपकाळातील रजा पूर्वरत खात्यावर जमा करणे या व इतर काही मागण्यांसाठी १२ वी च्या पेपर तपासणीवर टाकलेला बहिष्कार, यासंदर्भात दिनाक १६ फेब्रुवारी, २०१३ रोजी मा.शालेय शिक्षण मंत्री, राज्यमंत्री यांच्या समवेत तसेच दिनांक ७ मार्च, २०१३ रोजी मा.मुख्यमंत्री व मा. उप मुख्यमंत्री यांच्या सोबत झालेल्या चर्चेनंतर पेपर तपासणीवरील बहिष्कार मागे घेणे, दिनांक १३ मार्च, २०१३ रोजी मा.शालेय शिक्षणमंत्री महोदयांनी विधानपरिषदेत मागण्यांसंबंधी ३ महिन्याच्या आत निर्णय घेतो असे लेखी निवेदन देऊनही अद्याप या बाबत कोणताही निर्णय न घेणे, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाने दिनांक २० जुलै, २०१३ रोजी वरील मागण्यांच्या संबंधी शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मा.शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन आयोजित करणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

(२) **श्री. विनायकराव मेटे वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"मुंबई महापालिकेमध्ये गेल्या १०० वर्षांपासून सफाई कामगार आणि क वर्गाचे हजारो कामगार ४ पिढ्यांपासून बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत मुंबईच्या साफसफाईचे काम करीत असणे, हे सर्व सफाई कामगार महापालिकेच्या चाळींमध्ये भाड्याने राहत असून त्यांना त्यांच्या हक्काचे घर अद्यापही न मिळणे, गिरणी कामगारांना त्यांच्या हक्काचे घर शासनाकडून देण्यात येणे, ज्या झोपडीधारकांना महापालिका, शासन आणि अन्य खाजगी जागांवर अतिक्रमण केलेले आहे, त्यांना

कोणतेही अधिकार नसताना महाराष्ट्र शासनाने सन १९९५ च्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत मोफत घरे देण्याचे मान्य केलेले असणे, त्याच धर्तीवर या सफाई कामगारांना ते ज्या चाळींमध्ये भाड्याने राहतात त्या चाळींच्या भूखंडावरच घरे मिळण्याची होत असलेली मागणी, सध्या अस्तित्वात असलेल्या DCR ३३(७) अंतर्गत अशी पुर्नविकास योजना राबविण्याची नितांत आवश्यकता, विकासकाकडून या जागांच्या पुर्नविकासामध्ये, जेवढे सफाई कामगार तेथे राहतात त्यांना कायमस्वरूपी घरे देणे, व तेवढीच घरे महानगरपालिकेला बांधून देणे, ही योजना राबविल्यास महानगरपालिकेला स्वत:च्या मालकीची घरे उपलब्ध होऊ शकतील, याबाबत शासनाने ठोस निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **श्री. पांडुरंग फुंडकर वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"श्री.संत गजानन महाराजांच्या संजीवन समाधी शताब्दी सोहळयाचे निमित्ताने राज्य शासनाने शेगांव शहरासाठी शेगांव विकास आराखडा जाहीर करणे, मात्र ठोस अंमलबजावणी होत नसणे, शहरातील भुयारी गटार योजनेचे (सेव्हरेज लाईन) शासकीय स्तरावर काम घेणाऱ्या एम.एम.एस. पर्यावरण लि.दिल्ली या कंपनीने सदर काम २१ टक्के जास्त रकमेने स्विकारून ते पनवेल येथील ललित कन्स्ट्रक्शन या कंपनीला ६ टक्के कमी दराने देणे, यामुळे शहरातील विकास कामे निकृष्ट दर्जाची होत असल्याचे निष्पन्न होऊनही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून कंत्राटदारांविरूध्द कोणतीही कारवाई केली न जाणे, निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकण्याचे तसेच अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश शासनाने देऊनही अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई केली न जाणे, शेगांव विकास आराखड्यात होणारा भ्रष्टाचार व कामांचा सुमार दर्जा या विरोधात कारवाई न झाल्यास मोठ्या प्रमाणात जनआंदोलन करण्याचा तेथील लोकप्रतिनिधींनी शासनाला दिलेला इशारा, या प्रकरणी शासनाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबतची शासनाची भूमिका."

(४) **सर्वश्री मुझफ्फर हुसेन सय्यद, जयप्रकाश छाजेड, अमरनाथ राजूरकर वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"ठाणे जिल्ह्यातील वसई-विरार महानगर क्षेत्रातील विरार, नारींगी, शिरगांव, तुळींज, नालासोपारा, कामण, आचोळे, दिवाणमान तसेच, अन्य भागात मुस्लीम

समुदायाची संख्या मोठ्या प्रमाणात असून या भागात मुस्लीम स्मशानभूमी (क्रबस्तान) ची कमतरता असणे, अल्पसंख्यांक समाजाच्या कब्रस्तानसाठी राखीव भूखंड असूनही कब्रस्तान बांधण्यात न येणे, वसई तालुक्यातील कब्रस्तानसाठी राखीव असलेले भूखंड आजही शासनाने महानगरपालिकेकडे हस्तांतरित केलेले नसणे, मागील अनेक वर्षांपासून कब्रस्तान बांधण्यासाठी निवेदने, मोर्चे काढूनही निर्णय न होणे, महापालिका व शासनाचे याकडे लक्ष वेधण्यासाठी स्थानिक नागरिकांनी दिनांक १ जुलै, २०१३ रोजी वा त्या दरम्यान वसई तहसील कार्यालयाजवळ बेमुदत आमरण उपोषण करणे, अल्पसंख्यांक समाजात निर्माण झालेली नाराजीची व असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(५) **सर्वश्री. अशोक ऊर्फ भाई जगताप,** कपिल पाटील **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"मुंबई महानगरपालिकेच्या जकात विभागातील ३८ कर्मचाऱ्यांना दिनांक २८ डिसेंबर, २०११ पासून निलंबित करण्यात येणे, त्यांच्यावर दिनांक २९ मार्च, २०१३ रोजी आरोपपत्र लावण्यात येवून त्यांची दिनांक १ मार्च, २०१२ पासून खाते अंतर्गत चौकशी सुरू करण्यात येणे, प्रशासनाने सदरहू कर्मचाऱ्यांना निलंबित करताना कोणतीही शहानिशा तसेच कागदपत्रांची शहानिशा खातरजमा करण्यात न येणे, या निलंबित कर्मचाऱ्यांनी संबंधित विभागाकडे वारंवार लेखी निवेदने देण्यात येऊनही त्यांना कामावर घेण्यास दिरंगाई व टाळाटाळ करण्यात येत असल्याचे आढळून येणे, त्यांची परिस्थिती हालाखीची असून यामुळे त्यांच्या कुटुंबियांवर आलेली उपासमारीची पाळी, यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(६) **श्री. कपिल पाटील वि.प.स.**पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

जयसिंगपूर जि.कोल्हापूर येथील छत्रपती शाहू महाराजांनी वसविलेल्या बाजारपेठेमध्ये गेली नऊ दशके कर्नाटक, आंध्रप्रदेश येथील शेतकरी वर्गाकडून तंबाखू खरेदी करून तो साफसफाई करून भारतभर विडी व जर्दा उत्पादकांना पाठविण्याचा सुरू असलेला व्यवसाय, सदर तंबाखू व्यवहारात ३५०० महिला मजूर, १००० माथाडी कामगार, २०० बैलगाडी व टेंपोवाले, १००० दिवाणजी असे एकूण

५००० व्यक्तींना मिळणारा रोजगार, या व्यवसायावर शासनाने लावलेला १२.५ टक्के व्हॅट, मात्र शेजारील आंध्र प्रदेश, कर्नाटक, गुजरात या राज्यांमध्ये या व्यवसायावर व्हॅटची आकारणी नसणे, या व्यवसायातील एकूण वार्षिक आर्थिक उलाढालीपैकी महाराष्ट्रातील विक्री १० कोटी धरल्यास, महाराष्ट्र शासनाने आकारलेला व्हॅट १२.५ टक्के प्रमाणे एकूण कर १ कोटी २५ लक्ष व या उलाढालीपैकी अंदाजे ९० कोटी वरील परप्रांत सी.एस.टी. २ टक्के प्रमाणे आकारण्यात येणाऱ्या एकुण १.८० कोटी इतक्या करापैकी महाराष्ट्र शासनाला मिळणारा फक्त १० टक्के भाग म्हणजेच ०.१८ लक्ष अशाप्रकारे या व्यापारपेठेतून शासनास अंदाजे १.५० कोटीपेक्षा जास्त महसूल मिळण्याची शक्यता नाही, मात्र, सदर व्हॅट आकारणीमुळे व्यापारी स्थलांतरित होऊन हा व्यवसाय बंद पडण्याची निर्माण झालेली शक्यता, यामुळे, ५००० कुटुंबांसमोर उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण होणे, येथील जनतेमध्ये निर्माण झालेला प्रचंड प्रक्षोभ याबाबत शासनाने तातडीने करणेची कार्यवाही व उपाययोजना.

(७) **श्री. मोहन जोशी वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **गृह मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"पुणे शहरातील विमाननगर परिसरातील सनम हसन या १९ वर्षाच्या विद्यार्थिनीचा तिच्या वाढदिवसाच्याच दिवशी झालेला संशयास्पद मृत्यू, मृत्यूनंतर १० ते १२ तासांपर्यंत पोलीसांनी गुन्हा नोंदवून घेण्यास केलेली टाळाटाळ, त्या दिवशी मृत सनम हसन हिच्यासहीत एकूण चार महिला व एक पुरुष अशा पाच मृत शरीरावर ससून रूग्णालयात शवविच्छेदन झालेले असणे, राज्य न्याय वैद्यक प्रयोगशाळेत पाठविण्यात आलेला सनमच्या व्हीसेरा तपासणी नंतर त्यातील हृदयाचा भाग हा पुरूषाच्या हृदयाचा असल्याचे निष्पादित होणे, ससून सर्वोपचार रूग्णालय आणि राज्य न्याय वैद्यक प्रयोगशाळा यांचे या प्रकरणी एकमेकांवर होत असलेले आरोप प्रत्यारोप, मयताच्या व्हीसेऱ्यातील डीएनए तिच्या पालकांच्या डीएनएशी जुळत नसणे, याबाबत पोलीस महासंचालकांनी मयताची कबर उघडून पुन्हा तिच्या डीएनए तपासण्याची केलेली घोषणा, दर्जेदार फुटबॉलपटू व नियमित व्यायामशाळेत जाणाऱ्या सनमचा मृत्यु हृदयविकार व अतिमद्यप्राशन यामुळे झाला असे पोलिसांचे असलेले म्हणणे, पुणे परिसरातील विद्यार्थी आणि पालक यांच्या मनात सनमच्या संशयास्पद मृत्यूच्या तपासाविषयी पसरलेले संशयाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना."

(८) **सर्वश्री. विक्रम काळे, सतीश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.वसंतराव खोटरे वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **विशेष सहाय्य मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"राज्यात शासनाने सामाजिक न्याय खात्याच्यावतीने विनाअनुदान तत्वावर, खाजगी शिक्षण संस्थांना २८८ आश्रम शाळा सुरू करण्यासाठी परवानगी देणे, भविष्यात शासन अनुदान देईल या अपेक्षेने या शाळा आजही व्यवस्थित सुरू असून त्यांनी शासनाने वेळोवेळी घातलेल्या अटी व शर्तींची पूर्तता केली असणे, या शाळांमधून हजारो विद्यार्थी शिक्षण घेत असून तेथे शेकडो शिक्षक कर्मचारी विनावेतन काम करणे, अनुदान मिळावे यासाठी सातत्याने शिक्षक कर्मचारी यांची वेळोवेळी आंदोलने होणे, अनुदान देण्यासाठी विभागाकडून वेळोवेळी या सर्व शाळांच्या तपासण्या होणे, तपासण्या होवूनही या शाळांना अनुदान देण्यासंदर्भात शासनाचा निर्णय न होणे, त्यामुळे शिक्षक कर्मचाऱ्यांमध्ये गोंधळाची स्थिती निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(९) **डॉ. नीलम गोऱ्हे वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"राज्य शासनाच्या आरोग्य विभागाचे अधिकारी, महापालिकेचे डॉक्टर आणि धर्मादाय आयुक्तालयातील अधिकाऱ्यांनी पुणे जिल्ह्यातील शासकीय रुग्णांलयांची माहे एप्रिल-मे, २०१३ च्या सुमारास केलेल्या तपासणीचा अहवाल मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्याकडे सादर करण्यात येणे, या तपासणी अहवालात ३४ रूग्णालयांमध्ये त्रुटी आढळून आल्यानुसार सहधर्मादाय आयुक्तांकडून काढण्यात आलेल्या नोटीसा, या नोटीसीनुसार सदर रूग्णालयांनी करण्यात आलेल्या त्रुटींच्या पूर्ततेची तपासणी सहधर्मादाय आयुक्त, पुणे यांच्यामार्फत करण्यात येत असून अद्यापही काही त्रुटींची पूर्तता संबंधित रूग्णालयांनी न करणे, परिणामी गोरगरीब रूग्णांना सवलतीच्या दरात उपचार न मिळणे, त्यामुळे त्यांच्यात निर्माण झालेले संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची व केलेली कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका"

**(ब) लक्षवेधी सूचने संदर्भातील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे -**

**आदिवासी विकास मंत्री : "केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीचा शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाकडून गैरवापर"**

या विषयावरील श्री.दिपक सावंत वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या नियम १०१ अन्वये लक्षवेधी सूचनेच्या चर्चेच्या वेळी दिनांक ४ एप्रिल, २०१३ रोजी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती (सी.डी. स्वरूपात)", सभागृहासमोर ठेवतील.

**(क) लक्षवेधी सूचनेवरील निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे - (जोडपत्र पहावे.) -**

**सहा : म.वि.प. नियम १०१-अ अन्वये विशेष उल्लेख - (असल्यास).**

## - मध्यंतर -

**सात : शासकीय विधेयके -**

**(१) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडश: विचार व संमत करणे -**

सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक २३ - मुंबई शहर प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण, हैद्राबाद सक्तीचे प्राथमिक शिक्षण व मध्यप्रदेश प्राथमिक शिक्षण (निरसन) विधेयक, २०१३.

**क) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.रामदास कदम वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक २३ - मुंबई शहर प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण, हैद्राबाद सक्तीचे प्राथमिक शिक्षण व मध्यप्रदेश प्राथमिक शिक्षण (निरसन) विधेयक, २०१३ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४७ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक २३ - मुंबई शहर प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण, हैद्राबाद सक्तीचे प्राथमिक शिक्षण व मध्यप्रदेश प्राथमिक शिक्षण (निरसन) विधेयक, २०१३ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक २३ - मुंबई शहर प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण, हैद्राबाद सक्तीचे प्राथमिक शिक्षण व मध्यप्रदेश प्राथमिक शिक्षण (निरसन) विधेयक, २०१३ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.विनायक राऊत, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक २३ - मुंबई शहर प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण, हैद्राबाद सक्तीचे प्राथमिक शिक्षण व मध्यप्रदेश प्राथमिक शिक्षण (निरसन) विधेयक, २०१३ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(२) **विधानसभेने संमत केल्यास - विचार, खंडशः विचार व संमत करणे -**

**(अ)** सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक ३५ - महाराष्ट्र विधान मंडळ सदस्यांचे निवृत्तीवेतन (सुधारणा) विधेयक, २०१३.

**(ब)** सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक ३० - महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ विधेयक, २०१३.

**आठ : म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा -**

**सर्वश्री शरद रणपिसे,** जयदेवराव गायकवाड, विजय ऊर्फ भाई गिरकर, सुभाष चव्हाण, राम पंडागळे **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा -**

"संपूर्ण जगाला शांती, करूणा आणि मानवतेचा संदेश देणाऱ्या भगवान बुध्दांच्या अतिशय पवित्र अशा बोधगयेतील महाबोधीविहार परिसरात एकापाठोपाठ एक बॉम्बस्फोट केल्याच्या घटनेने संपूर्ण देश हादरून जाणे, या बॉम्ब स्फोटाची जबाबदारी स्वत:कडे घत काही अतिरेकी संघटनेने मुंबईवरही हल्ला करणार असल्याचा इशारा व्टिटरवर देणे, त्यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेले भीतीचे वातावरण, महाबोधी परिसरातील बॉम्बस्फोटाच्या पार्श्वभूमीवर राज्यात बौध्दांचे धार्मिक स्थळ असलेले दीक्षा भूमी (नागपूर),

चैत्यभूमी (दादर, मुंबई), पॅगोडा (गोराई, मुंबई), धम्मगिरी (नाशिक), अजंठा, एलोरा तसेच हिंदू, जैन, शिख, मुस्लीम प्पर्थनास्थळे व मंदिरे इत्यादी स्थळांच्या सुरक्षिततेबाबतचा निर्माण झालेला प्रश्न, त्यामुळे राज्यातील सर्वच धार्मिक स्थळांच्या सुरक्षिततेच्या जबाबदारीसाठी आवश्यक ती उपाययोजना करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**- अशासकीय कामकाज -**

**(बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)**

**नऊ : (अ) अशासकीय ठराव :-**

**(गतसत्रात शुक्रवार, दिनांक ५ एप्रिल, २०१३ रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेले परंतु प्रलंबित राहिलेले अशासकीय ठराव ) -**

**(१) श्री.रमेश शेंडगे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ६७ -**

"राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व रोजगारांअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी व गरीब कुटुंबातील व्यक्तीला रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**(२) डॉ. सुधीर तांबे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ११४ -**

"राज्यातील शेतकऱ्यांवर नेहमीच दुष्काळाची छाया पसरलेली असते. कधी ओला दुष्काळ तर कधी सुका दुष्काळ ही परिस्थिती शेतकऱ्यांवर नेहमीच येत असते. यामुळे अनेक शेतकरी कर्जबाजारी होतात व यातून त्यांच्या आत्महत्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. सध्या गोवा सरकारने शेतकऱ्यांना पेन्शन योजना सुरु केल्या आहेत त्याच धर्तीवर महाराष्ट्र शासनानेही राज्यातील दारिद्रय रेषेखालील शेतकऱ्यांना पेन्शन योजना सुरु करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**(३) श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १३७ -**

"मुंबईसह राज्यात मोठ्या प्रमाणात रस्त्यावर थुंकणे, कचरा टाकणे, अस्वच्छता ठेवणे असे प्रकार घडत असून यामुळे शासनाचा मोठ्या प्रमाणात खर्च याठिकाणी स्वच्छता राखण्यात होत आहे. अशाप्रकारच्या बेशिस्त वागण्यावर

नियंत्रण आणण्यासाठी व लोकांमध्ये समाजाप्रती व देशाप्रती नैतिकता जागरुक करुन स्वतःच्या जबाबदारीची जाणीव निर्माण करण्याकरीता शालेय शिक्षणापासून नागरिक शास्त्र हा विषय १०० गुणांसाठी करुन त्यांतून चांगला माणूस निर्माण करणारे शिक्षण देण्याचा कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे."

**(ब) अशासकीय विधेयक :-**

**(शुक्रवार, दिनांक २६ जुलै, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेले अशासकीय विधेयक) -**

**विचारार्थ -**

सन २०११ चे वि.प.वि.क्रमांक १३ - महाराष्ट्र सहाय्यक प्रजनन तंत्रज्ञान (नियमन) विधेयक, २०११, श्री. विनोद तावडे, वि.प.स. यांचे.

# " राष्ट्रगीत ".

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १ ऑगस्ट, २०१३.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.